# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - I

**Time : 3 Hours** **(Pages 12)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** **1**

सुश्रुतला शिक्षकांनी
- सांगितली → [ ]
- दाखविली → [ ]

**(ii) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **1**

तुम्ही सगळे कोण आहात?
- कोण → [ ]
- कोणास → [ ]

सुश्रुतच्या वर्गाची सहल भिलार या पुस्तकांच्या गावाला नेण्याचे ठरले. वर्गात सूचना आली. दुसऱ्या दिवशी सुश्रुतला शिक्षकांनी भिलार या गावाची माहिती सांगितली. त्याबाबत एक फिल्म दाखवली. सुश्रुतला ते खूप आवडले. घरी परतल्यावर तो सहलीला जाणार म्हणून आनंदाने झोपला.

काही वेळाने त्याला जाणवले, की काही पुस्तके मुलामुलींचा वेश करून आणि हातात हात घालून आनंदाने गाणी गात आहेत, नाचत आहेत. एवढंच नाही तर त्याला उठवतही आहेत. सुश्रुत झोपेतच म्हणाला ''कोण रे तुम्ही, इथे काय करत आहात?'' पुस्तकाच्या वेशातील मुले सुश्रुतला म्हणाली, ''अरे आम्ही सर्व तुला भेटायला आलो आहोत. आम्हाला तुझ्याशी मैत्री करायची आहे.''

**सुश्रुत** : तुम्ही सगळे कोण आहात?

**कथा** : अरे, असा घाबरतोस काय? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळ्यांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे, मी आहे कथा. गोष्ट हे माझंच दुसरं नाव.

**सुश्रुत** : आपली ओळख कशी काय?

| | | |
|---|---|---|
| **कथा** | : | आईच्या, आजीच्या तोंडून इसापनीती, पंचतंत्र, अकबर-बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना! |
| **सुश्रुत** | : | होऽऽ आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा, उंदीर, ससा-कासव यांच्या गोष्टी सांगायची. |
| **कथा** | : | बरं का सुश्रुत! आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये. |

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

सुश्रुतच्या वर्गाची सहल ............... गावाला नेण्याचे ठरले.

(किल्लारी, भिलार, पुणे, ठाणे)

(ii) **खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

अरे आम्ही सर्व तुला भेटायला आलो आहोत, असे सुश्रुतला कोण म्हणाले ?

(३) **व्याकरण :**

(i) **उताऱ्यातील दोन सर्वनामे शोधून लिहा.** **1**

(अ) ............. (आ) .............

(i) **उताऱ्यातील दोन विशेषणे शोधून लिहा.** **1**

(अ) ............. (आ) .............

(४) **स्वमत :** **2**

'उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते' यावर तुमचे विचार स्पष्ट करा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i) **निरंजन सकाळी लवकर उठून या विषयांचा अभ्यास करत होता.**

→ [ ] → [ ]

(ii) **चटकन पाठ होतो** → [ ] **सकाळच्या वातावरणात** **चटकन कळते** → [ ]

निरंजन आज भल्या पहाटेस उठून अभ्यासाला बसला होता. आज शेवटचा, नागरिकशास्त्राचा पेपर. तो झाला की, संपलीच परीक्षा. इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र, तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो. त्यात हे नागरिकशास्त्र जरा अवघडच.

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता; कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला - ‘रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.’

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

गुरुजींचंही ............... खूप प्रेम होतं.

(सदानंदावर, निरंजनवर, अतुलवर, रंजनवर)

(ii) **खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

मामाने निरंजनला कोठे आणून सोडले ?

(३) **व्याकरण :**

**खालील विशेषण विशेष्यांच्या जोड्या जुळवा.** **2**

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| (i) योग्य | (अ) विश्रांती |
| (ii) सुखद | (ब) सल्ला |
| (iii) पुरेशी | (क) वातावरण |
| (iv) प्रसन्न | (ड) गारवा |

(४) **स्वमत :** **2**

‘अभ्यासासाठी पहाटेचे वातावरण पोषक असते’ यावर तुमचे विचार मांडा.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** 2




विद्वत्ता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाहीत, त्यासाठी महिने-वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढा त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वत्तेचेही आहे. जेवढ्या प्रयत्नाने ती मिळवाल तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तिमत्त्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वत्ता ही अशी बाब आहे, जी केवळ वेळेच्या सुदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरून घेऊ शकत नाही. ती मिळवण्यात खूप धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरातिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वत्ता तुम्हांला सर्व मिळवून देते, ज्याची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

**(२) खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.** 2

| | **घटना/कृती** | | **परिणाम** |
|---|---|---|---|
| (i) | झाडाची मुळे खोल जाणे | (i) | ........................ |
| (ii) | प्रयत्नांनी विद्या मिळवणे | (ii) | ........................ |

**(३) व्याकरण :**

(i) **खालील शब्दसमूहाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.** 1

विजेसारखे चमकणे –

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

<u>संपूर्ण</u> राष्ट्र तुमच्या प्रकाशाने दिपून जाईल.

**(४) स्वमत :** 2

व्यक्तीला विद्या प्राप्त झाल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी मिळू शकतात ते स्पष्ट करा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i)




(ii)




नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,

धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्याचं असें
तुला एकच औक्षण.

**(२) (i) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

............... किती हा लहान. (जीव, मुठ, शान, माणूस)

**(ii) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

जवानाचे रक्षण कसे होणार आहे?

**(३) सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो या विधानातील भाव स्पष्ट करा.** **2**

**(४) देशसेवा हीच ईश्वरसेवा असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकासाठी तुम्ही काय करू शकता ते लिहा.** **2**

प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

(१) आकृतिबंध पूर्ण करा. 2

(i)




(ii)




झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर ? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर ? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं !

(२) **(i) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

झाडांच्या जीवनाचे एक संथ गाणे कोठे दडले आहे?

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

.............. झाडांचे कुणीच नसतात तरीही झाडं त्याचं असतं.

(प्राणी, माणसे, पक्षी, किटक)

(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** **2**

'झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी'

(४) **झाडापासून आनंदी जीवन जगणे शिकावे या विधानातील विचार स्पष्ट करा.** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) फुलामुलांतून हसतो श्रावण मातीचे हो मंगल तनमन चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

**विभाग ३ – स्थूलवाचन**

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) **टिपा लिहा.**

व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

(२) **खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**




(३) **'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.**

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | नापसंत | --------------- | --------------- |
| (ii) | पाऊसपाणी | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

**खालील उदाहरण वाचून कृती करा.**

आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे।

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म (गुण) |
|---|---|---|---|
| -------- | -------- | -------- | -------- |

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. एकटा माणूस जास्त काम करू शकत नाही. (होकारार्थी करा.)

२. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. (प्रश्नार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** **2**

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| क्र. | दिलेला शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (१) | शिक्षकांनी | -------- | -------- |
| (२) | पुस्तकात | -------- | -------- |

(v) **वाक्प्रचार** **2**

**खालील वाक्यांत कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(हकालपट्टी करणे, पाया घालणे, उसंत न लाभणे)

१. पैशाच्या घोटाळ्यामुळे अनिशला ऑफिसमधून बाहेर काढले.

२. काही कारणामुळे संध्याकाळी मला ओंकारेश्वराला जायला वेळ मिळाला नाही.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. वाट - ............ २. रसना - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

१. छोटे × [ ] २. मित्र × [ ]

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** 1

पैसे कर्जाऊ देणारा - .............

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** 1

[ ] ← पद → [ ]

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** 1

१. लिंबोणी, लिंबोनी, लिंबोणी, लींबोणी २. कवियत्री, कवयीत्री, कवियित्री, कवयित्री

(ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** 1

आयुश्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर सिदोरी दिली.

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.** 2

१. मी म्हटले बाबा तुम्ही मला ओळखले

२. या शाली घेऊन घेऊन मी आता शालीन बनू लागलो आहे

**(४) पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** 1

१. Academic Qualification - २. Bio-data -

**(५) भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

उपमा, लढाई, परीक्षा, आयोजन

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन** **5**




**(२) सारांश लेखन** **5**

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

शेतीप्रधान असलेल्या आपल्या देशातल्या खेड्यांची रचना मोठी वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. या रचनेला विविध स्तर आहेत अन् हे स्तर पुन्हा परस्परावलंबी असे आहेत. झाडाच्या मुख्य खोडापासून जशा वेगवेगळ्या आकाराच्या नि लांबीच्या फांद्या फुटलेल्या असाव्यात, तशी ती रचना असते. किंवा आपल्या तळहाताला लवचीक अन् परस्परांना उपयोगी पडणारी बोटे असावीत, तशी ही ग्रामजीवनाची रचना असते. खोडालाही जसा भूमीचा आधार असतो, तसा या रचनेचा आधारही भूमीच असते. शेती हाच या ग्रामरचनेचा मुख्य आधारभूत घटक आहे तो शेतीत राबणारा शेतकरी. मग येतात शेतकऱ्याला उपयोगी पडणारे महत्त्वाचे बलुतेदार. त्यानंतर माळी, गुरव, साळी, कोष्टी, शिंपी यांसारखे बलुतेदार. त्यानंतर या शेतकऱ्यांशी संबंधित असतो गावकुसाबाहेरचा समाज.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) जाहिरात लेखन**

**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती करा.**

**साद देती हिमशिखरे !**

युवक - युवतींनो, तुमच्या तरूणाईला एक नवे आव्हान

# पंचम हायकर्स

**आयोजक :** मनिष भोसले

**वैशिष्ट्ये :** पूर्वनियोजित गिरीभ्रमण, राहणे, जेवण मोफत, उपकरणे उपलब्ध, गट पद्धती

**दरवर्षीप्रमाणे यंदाही फक्त तुमच्यासाठी ही गिर्यारोहणाची मोहीम आयोजित केली आहे. अधिक माहितीसाठी ५ एप्रिलपर्यंत संपर्क करा.**

**पंचम हायकर्स**

१२२, डॉ. परांजपे मार्ग, शिवाजीनगर, पुणे.

दूरध्वनी : २४४३३२२०

१) चौकट पूर्ण करा. **2**

(i) जाहिरातीचा विषय – ☐

(ii) आयोजक – ☐

२) गिर्यारोहण मोहिमेची वैशिष्ट्ये **2**

(i) ..................... (iii) .....................

(ii) ..................... (iv) .....................

३) नाव लिहा. **1**

आयोजक संस्था - .....................

४) पंचम हायकर्सचा पत्ता - ..................... **1**

**(२) कथा लेखन** **6**

**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

**मुद्दे :** एक राजा – त्याच्याकडील गुलामाचा अपराध – गुलामास फाशीची शिक्षा – गुलामाचे रानात पळून जाणे – सिंहाच्या गुहेत आगमन – सिंहाच्या पायात काटा – वेदनेने व्याकुळ – गुलामाने सिंहाच्या पायातील काटा काढणे – जखम बरी – गुलाम पुन्हा पकडला जाणे – भुकेलेल्या सिंहाच्या पिंजऱ्यात टाकणे – सिंहाने गुलामाचे पाय चाटणे.

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** **8**

**(१) हिमालयाचे आत्मवृत्त**



(२) मला देव भेटला तर...



१. ही कल्पना का सुचली ?
२. सर्वत्र फक्त प्रकाश
३. देवाशी संवाद
४. निसर्ग व जीवन याविषयी बोलणे
५. देवाची अपेक्षा

**Best Of Luck**